**कि.फौ.अर्ज.क्र. १८/२०२५**

**फिलिप वि. रेव्ह जोसेफ**

**नि. ०१ खालील आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी जाबदेणार यांच्या विरुध्द भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १७५(३) अन्वये फिर्याद दाखल करुन घेण्याबाबतचे आदेश पारीत करणेबाबत दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार ते व त्यांचे संपुर्ण कुटूंब तळेगाव स्टेशन येथील मेथडीस्ट चर्च मध्ये सक्रिय सभासद असून द इंडियन मेथडीस्ट चर्च डिसीप्लीन नियमांप्रमाणे क्रिस्त धर्माचे उपासक आहेत. त्यांच्या रविवारच्या चर्च उपासनेत सहभागी होण्यासाठी कंपनी मधून सुटी मिळावी, तसेच अर्जदारांच्या मुलाचे लग्न ठरविण्याकामी त्यांचे व त्यांच्या मुलाचे सभासद प्रमाणपत्र गरजेचे होते. त्याकरीता त्यांनी दि. १०/११/२०१८ रोजी वर नमुद चर्च मधून प्रमाणपत्राकरीता मागणी केली होती. परंतु जाबदेणार यांनी अर्जदारास प्रमाणपत्र देण्यास टाळाटाळ केली. तदनंतर अर्जदार यांनी चौकशी केल्यानंतर दि. २९/१२/२०२३ रोजीच्या मेथडीस्ट मराठी सेंन्टेनरी चर्च, तळेगाव दाभाडे चर्च पास्टरेट कॉन्फरन्स मध्ये झालेल्या ठरावानुसार त्यांचे व त्यांच्या कुटूंबियांचे सभासदत्व त्यांना कोणतीही लेखी किंवा तोंडी समज न देता, तसेच कोणत्याही कारवाई बाबतीत कोणतीही कल्पना न देता, त्यांविरोधात एकतर्फी कारवाई करुन, त्यांचे सभासदत्व रदद करण्यात आले आहे.

३. अर्जदार यांचे पुढे कथन असे की, अर्जदार यांनी दि. २९/१२/२०२३ रोजी झालेल्या ठरावाबाबत जाबदेणार यांच्याकडे वारंवार चौकशी केली असता त्यांनी त्या संबंधीचे कोणतेही कागदपत्रे अर्जदार यांना दिलेले नाहीत. त्याचप्रमाणे जाबदेणार यांनी अर्जदार यांच्या विरुध्द खोटया तक्रारी दाखल केलेल्या आहेत. सबब दि. २९/१२/२०२३ रोजी जाबदेणार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या

मिटींगमध्ये उपस्थित सदस्य यांनी त्यांच्या पदाचा व अधिकाराचा गैरवापर केलेला आहे. त्यामुळे जाबदेणार यांनी भारतीय न्याय संहिता कलम ४९, ६१(२), १२६, २३९, २९९, ३०२, ३१८(१)(३), ३३६,(१)(२)(४), ३५१(१)(२)(३), ३५६(१)(२) नुसार गुन्हा केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे त्यांच्या विरुध्द भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १७५(३) अन्वये फिर्याद दाखल करुन घेण्याबाबत आदेश पारित करण्यात यावे ही विनंती.

४. प्रस्तुत अर्जास तपासी अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्यावर निलंबनाचे केलेल्या कार्यवाहीचे लेखी उत्तर अर्जदार यांना देण्याचे कबुल केलेले आहे. सबब पुढील आदेश होण्याची विनंती केलेली आहे.

५. अर्जदार तर्फे विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला, प्रकरणाचे अवलोकन केले. अर्जदार यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ त्यांच्या तक्रारी अर्जाबाबतचा तपासी अधिका-यांचा तपासी अंमलाबाबतच्या, गैरअर्जदारांनी अर्जदारांनंतर दाखल केलेल्या तक्ररी अर्जाची दखल घेवून तपासी अधिका-यांनी अर्जदारास पाठविलेल्या समज पत्राची प्रत तसेच वर्तमान पत्रातील बातमीच्या प्रत या कामी दाखल केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे अर्जदार यांनी दि. ३०/०१/२०२५ रोजी मा. पोलिस उपायुक्त पिंपरी चिंचवड येथे दाखल केलेल्या तक्रारी अर्जाची प्रत, जाबदेणार यांनी तळेगाव पोलिस स्टेशन येथे जमविलेल्या जवळपास ७० ते ७५ लोकांच्या जमावाचे फोटो अर्जदार यांनी त्यांच्या मोबाईल मध्ये काढलेल्या व्हाटसअप ग्रुपवरील स्क्रीनशॉटचे फोटो तसेच अर्जदारांना पोलिसांनी व्हाटसअप द्वारे दिलेल्या समज पत्राची प्रत या कामी दाखल केलेले आहे.

६. संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले असता अर्जदार यांनी जाबदेणार यांनी त्यांचे सभासदत्व रदद केल्यामुळे जाबदेणार यांचेविरुध्द पोलिस स्टेशनला तक्रार दाखल केल्याचे दिसून येते. परंतु त्यांनी कोणतीही दखल न घेतल्यामुळे

अर्जदार यांनी मा. पोलिस उपायुक्त यांना देखील तक्रारी अर्ज पाठविल्याचे दिसून येते. परंतु त्यानंतरही कोणतीही दखल न घेतल्यामुळे त्यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु संपुर्ण प्रकरणातील दाखल कागदपत्रावरुन सध्या जाबदेणार यांच्या विरुध्द अर्जातील नमुद कलमांनुसार गुन्हा दाखल होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. त्यामुळे सध्या जाबदेणार यांच्या विरुध्द दखलपात्र गुन्हा दाखल करुन घेणेबाबत आदेशीत करण्याइतपत प्रथमदर्शनी पुरावा अभिलेखावर दिसून येत नाही. त्यामुळे सध्या जाबदेणार यांच्या विरुध्द भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १७५(३) अन्वये फिर्याद दाखल करुन घेण्याबाबतचे आदेश पारित करणे न्यायोचित वाटत नाही.

**७.** परंतु, अर्जदार यांना कायदयातील तरतुदी नुसार पुरावा दाखल करुन जाबदेणार यांच्या विरुध्द योग्य ते आदेश होवून मिळण्याचे अधिकार आहेत. परंतु प्रस्तुत प्रकरणामध्ये तपासी अंमलदार यांच्या म्हणण्यानुसार गैरअर्जदार यांनी अर्जदार यांचेवर निलंबनाच्या केलेल्या कार्यवाहीची लेखी प्रत अर्जदार यांना देण्याचे कबुल केले असल्याचे दिसून येते. परंतु, अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार सदरची प्रत त्यांना अदयाप मिळालेली नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणात संबंधीत पोलिस स्टेशन मार्फत चौकशी होवून त्याबाबत अवहाल मागविणे न्यायोचित वाटते. सबब न्यायाचे कारणास्तव मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते -

## <u>आदेश</u>

१. अर्जदार यांचे भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १७५(३) अन्वये जाबदेणार यांच्या विरुध्द फिर्याद दाखल करुन घेण्याबाबतची मागणी फेटाळण्यात येत आहे.

२. संबंधीत पोलिस स्टेशन यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २२५ अन्वये सदर प्रकरणाची चौकशी करुन आवश्यक ती कागदपत्रे व त्यांचा विस्तृत अहवाल आदेश पारित तारखेपासून ०२ महिन्यांमध्ये अगर तत्पूर्वी दाखल करण्याचा आहे.

३. संबंधीत पोलिस स्टेशनला भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २२५ अन्वये चौकशी करणेबाबत नोटीस पाठविण्यात यावी.

SAVITA APPASO MALI
Digitally signed by SAVITA APPASO MALI
Date: 2025.11.20 12:38:43 +0530

दिनांक – २०.११.२०२५

( एस. ए.माळी )
५वे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
वडगाव मावळ, पुणे